महाराष्ट्र
शासन

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : एसबीसी-२०००/प्र.क्र.१४१ /मावक - २
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : १८ जुलै, २०००.

अरुण बोंगिरवार
मुख्य सचिव

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व अतिरिक्त आयुक्त (महसूल) तथा
अध्यक्ष, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपजिल्हाधिकारी / उप विभागीय अधिकारी,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.

**विषय :- जाती प्रमाणपत्र देणे व जाती वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०९६/ प्र.क्र.४८/मावक ५, दिनांक ३.६.९६ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी जादा पुरावे देण्याबाबतही आग्रह धरला जातो. याबाबत आपले लक्ष या विभागाच्या दिनांक ३ जून, १९९६ च्या शासन निर्णयाकडे वेधण्यात येते. सदर शासन निर्णया मध्ये दिलेल्या सुचनानुसार जातीची प्रमाणपत्रे देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच जातीचे प्रमाणपत्र देण्याचे काम शासनाने घालून दिलेल्या मुदतीचे आत व तातडीने पूर्ण करावे. एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात स्थलांतरीत झालेल्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देण्यात येत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत शासन निर्णय दिनांक ६.१०.८६ अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन करावे.

२. मागासवर्गीयांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची दिनांक २०.१२.९९ च्या शासन निर्णयान्वये पुर्नरचना करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित विभागाचे अतिरिक्त आयुक्त (महसूल) हे या समित्यांचे अध्यक्ष आहेत. तसेच या समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत दिनाक २५.१.२००० च्या शासन निर्णयान्वये आदेश काढण्यात आले आहेत. सदर आदेश स्वयंस्पष्ट असतानाही उमेदवारांना

......२/-

जाती वैधता प्रमाणपत्र मिळण्यामध्ये अडचणी येत आहेत व जाती वैधता प्रमाणपत्र वेळेवर दिले जात नाही अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. यामुळे याबाबत अशा सूचना देण्यात येत आहेत की, ज्या उमेदवारांकडे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र असेल व त्यांनी आवश्यक ते पुरावे सादर केल्यास, त्यांना जातीचे वैधता प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे. उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे जाती दावा सिध्द होत असेल तर उमेदवारांकडून अधिकची कागदपत्रे मागवून वैधता प्रमाणपत्र देण्यास विलंब करण्याची प्रवृत्ती टाळावी. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये जाती वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत जी कालमर्यादा घालून दिली आहे त्याचे कटाक्षाने पालन करावे जेणेकरुन जाती वैधता प्रमाणपत्र तपासणीचे काम साचून न राहता वेळेपूर्वी वैधता प्रमाणपत्र मिळाल्यास विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेणे अडचणीचे होणार नाही.

(अरुण बोंगिरवार)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत: माहितीसाठी अग्रेषित
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे